**अंगणवाडी सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका यांना एकदाच ५% वेतनवाढ मंजूर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः- एबावि-२०१७/प्र.क्र.१०३/का-६**
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ एप्रिल, २०१८

वाचा :- (१) महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.१०३/का.६, दि.२३ फेब्रुवारी २०१८
(२) मा.मंत्रिमंडळाचा दिनांक २१/१२/२०१७ निर्णय

प्रस्तावना:-

सन १९७५ पासून एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांच्या विकासाकडे लक्ष देण्यासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व त्याबाबतचे आर्थिक निकष केंद्र शासनाकडून वेळोवेळी मंजूर करण्यात येतात. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात ५५३ प्रकल्पातंर्गत अंगणवाडी सेविका ९७४७५, मदतनीस ९७४७५ व मिनी अंगणवाडी सेविका १३०११ असे एकूण २,०७,९६१ मानधनी कर्मचारी पदे मंजूर आहेत. अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनासाठी केंद्र शासनाकडून ६०% व राज्य शासनाकडून ४०% याप्रमाणे निधी दरवर्षी केंद्र शासनाच्या निकषानुसार मंजूर करण्यात येतो.

२. अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनामध्ये दरवर्षी वेतनवाढीप्रमाणे वाढ करणेकरिता शासनास शिफारस करण्यासाठी प्रधान सचिव (महिला व बाल विकास) यांच्या अध्यक्षतेखाली सेविकांच्या संघटनेच्या पदाधिकारी यांचा समावेश असलेली समिती दिनांक २० जुलै २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल मा.मंत्री (महिला व बाल विकास) यांना दिनांक ९ मार्च २०१७ रोजी सादर केला होता.त्यामध्ये सेविकांच्या मानधनात वाढ करणे, सेवासमाप्तीचे वय कमी करणे यासह अनेक शिफारशी केलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कृती समितीकडुन अंगणवाडी सेविका व मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांचे मानधन वाढविण्याच्या मागणीसाठी दिनांक ११.०९.२०१७ पासून बेमुदत संप सुरु करण्यात आलेला होता. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्यासमवेत अंगणवाडी संघटनेच्या पदाधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेत

दिनांक १ ऑक्टोबर २०१७ पासून सेवाजेष्ठतेनुसार सेविकांच्या मानधनात वाढ करणे, सन २०१७-१८ पासून देण्यात येणाऱ्या भाऊबीज भेट रक्कम रुपये १०००/- मध्ये वाढ करुन ती रुपये २०००/- करणे, सेवासमाप्तीचे वय ६५ वरुन ६० वर्षे करणे, दिनांक १ एप्रिल २०१८ रोजी एकदाच ५% वेतनवाढ मंजूर करणे इ. निर्णय जाहिर करण्यात आलेले होते. त्यानुसार अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना आश्वासित केल्याप्रमाणे सेवाजेष्ठतुनसार मानधनात वाढ करणे व भाऊबीज रक्कमेत वाढ करणे, सेवा समाप्तीचे वय ६५ वरुन ६० वर्षे करण्याचा शासन निर्णय दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून एकदाच ५% वेतनवाढ मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यातील सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून एकदाच ५ % वेतनवाढ देण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०२१४३३४३६१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.05.02 15:11:13 +05'30'

( ला.रा.गुजर )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री,मंत्रालय,मुंबई
५. मा.विरोधी पक्ष नेता,महाराष्ट्र विधानसभा,विधामंडळ,मुंबई
६. मा.विरोधी पक्ष नेता,महाराष्ट्र विधानपरिषद,विधानमंडळ,मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
८. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
९. अपर मुख्य सचिव ( वित्तीय सुधारणा),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

१०. अपर मुख्य सचिव ( नियोजन.),नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
११. सचिव (महिला व बाल विकास विभाग), मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई
१४. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. महासंचालक,माहिती व प्रसिध्दी,मंत्रालय,मुंबई
१६. सर्व मंत्रालयीन विभाग
१७. सर्व विभागीय आयुक्त
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०. सर्व महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका
२१. सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
२२. सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हापरिषद)
२३. सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी )
२४. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका,
२५. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
२६. महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, औरंगाबाद
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
२९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३०. महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
३१. निवड नस्ती (कार्यासन ६).